# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०८/०४/२०२५ (मंगळवार)**

---

## रामटेक उपविभागाअंतर्गत अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ५ गुन्हे नोंद , ६ आरोपी अटक ,एकुण १ कोटी ७७ लाख ४० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

## उपविभागिय पोलीस अधिकारी , रामटेक यांच्यासह पोलीस स्टेशन रामटेक आणि अरोली यांची संयुक्त कामगिरी

दिनांक ०८/०४/२०२५ रोजी श्री रमेश बरकते, उप विभागीय पोलीस अधीकारी रामटेक हे त्यांच्या उपविभागात अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोंलिंग करीत असतांना त्यांनी पोलीस स्टेशन रामटेक आणि अरोली येथील अधिकारी आणि अंमलदार यांच्या सह पेट्रोलींग केली असता गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे श्री रमेश बरकते,यांनी त्यांच्या पथकांसह खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई कं १.** नमुद पथक पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत पेट्रोंलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, तुमसर मार्गे रामटेक कडे अवैधरित्या रेतीने भरलेला टिप्पर येत आहे. आशा माहीती वरून मौजा नवरगाव शिवार,काचुरवाही फाटा येथे नाकाबंदी करून टिप्पर क्र. एम. एच. ४० बी एफ. ९९९६ या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे रूषी रमेश वैरागडे , वय ३८ वर्षे , रा. खसारा ता.कामठी जि नागपुर हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने वाहन मालक शुभम रडके रा मसाळा,ता कामठी जि नागपुर यांच्या कडे परवाना तो परवाना घेवुन येत असल्याचे सांगितले.परंतु वाहन मालक परवाना घेवुन आला नाही.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) ८ ब्रास रेती किंमती ४८,००० /— रूपये आणि २) टिप्पर**

**क्र. एम एच** ४० बी एफ. ९९९६ **किंमती २५,००,०००/— रूपये असा एकुण २५,४८,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं २.** नमुद पथक पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत पेट्रोंलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, तुमसर मार्गे रामटेक कडे अवैधरित्या रेतीने भरलेला ट्रक येत आहे. आशा माहीती वरून रूद्र ढाबा, नवरगाव येथे नाकाबंदी केली असता ट्रेलर क्र. एम. एच. ४० सी. टी. ६७३५ या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे शिवशंकरकुमार जोसन सिंग , वय २३ वर्षे , रा. किसैनी,जि पलामु राज्य झारखंड हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या सोबतच असलेल्या वाहन मालक निकेश घनवीर पारखी रा पिंडकापार,ता रामटेक जि नागपुर यांच्या कडे परवाना असल्याचे सांगितले.परंतु वाहन मालकाकाडे कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) १२ ब्रास रेती किंमती ७२,००० /— रूपये आणि २) ट्रेलर क्र. एम एच ४० सी टी ६७३५ किंमती ३०,००,०००/— रूपये असा एकुण ३०,७२,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ३.** नमुद पथक पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत पेट्रोंलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, नागपुर ते जबलपुर हायवे वर अवैधरित्या रेतीने भरलेला ट्रक येत आहे. आशा माहीती वरून कांद्री वस्ती गाव येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम. एच. ४९ बी. झेड ९८९७ या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे अशफाक युसुफ खान , वय ४२ वर्षे , रा. कामगार नगर,कळमना रोड,कामठी जि नागपुर हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. सदर वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक साकीब रजा खान रा.कामठी जि नागपुर अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) १० ब्रास रेती किंमती ३०,००० /— रूपये आणि** २) **ट्रक क्र. एम एच** ४९ बी. झेड ९८९७ **किंमती ४०,००,०००/— रूपये असा एकुण ४०,३०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ४.** नमुद पथक पोलीस स्टेशन अरोली हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, खात ते घोटमुंढरी मार्गे अवैधरित्या रेतीची वाहतुक होत आहे. आशा माहीती वरून खात ते घोटमुंढरी रोडवर नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम. एच. ४० बी. एल ०१७६ या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे अशिष प्रकाश कनपटे , वय ३० वर्षे , रा. निलज ता. मोहाडी जि. भंडारा हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. सदर वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक किशोर चकोले रा.खात ता.मौदा जि नागपुर अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) ९ ब्रास रेती किंमती ४५,००० /— रूपये आणि २) ट्रक क्र. एम एच** ४० बी. एल ०१७६ **किंमती ४०,००,०००/— रूपये असा एकुण ४०,४५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ५.** नमुद पथक पोलीस स्टेशन अरोली हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, खात ते घोटमुंढरी मार्गे अवैधरित्या रेतीची वाहतुक होत आहे. आशा माहीती वरून खात ते घोटमुंढरी रोडवर नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम. एच. ४० बी. जी ९३०२ या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे अनिल सुखदेव राउत , वय ४७ वर्षे , रा. बीड, ता. मोहाडी जि. भंडारा हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. सदर वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक किशोर प्रभाकर चकोले रा.खात ता.मौदा जि नागपुर अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) ९ ब्रास रेती किंमती ४५,००० /— रूपये आणि २) ट्रक क्र. एम एच** बी. जी ९३०२ **किंमती ४०,००,०००/— रूपये असा एकुण ४०,४५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर कारवाईत एकुण १,७७,४०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.नमुद चालक मालक आरोपीतांच्या विरूध्द कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,सह कलम ३ सार्व संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये पोस्टे**

रामटेक येथे  ३ गुन्हे आणि पोलीस स्टेशन अरोली येथे २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे. एकुण ६ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे.




GOODS 435 CARRIER
ANUJ
COACH
ASHOK LEYLAND



# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कन्हान :– फिर्यादी अतुल चिंतामण मदनकर,वय २९ वर्ष रा. बोरडा ता. पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे अप क्र. ४८/२३ कलम ३०७,३४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व अरोपी क्र. ०१ नामे अभिषेक नरेंद्र महल्ले वय २२ वर्ष, रा. बोरडा ता. पारशिवनी यांच्यात घटनेच्या काही महीण्यांपुर्वी गावातील एका कार्यक्रमात भांडण झाले होते, या घटनेचा मनात राग धरून घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा गावात सुरू असलेला कुस्तीची आम दंगल व रेकॉर्डींग डान्स चा कार्यक्रम बघत असतांना स्टेज लगत लोंकाची गर्दी जमलेली असल्याने गावातील काही इसम गर्दीतील लोंकाना बाजुला करीत असतांना आरोपी क्र. ०१ अभिषेक नरेंद्र महल्ले वय २२ वर्ष, रा. बोरडा ता. पारशिवनी याने फिर्यादीचे गावातील एका इसमास धक्का बुक्की करून थापड मारल्याने फिर्यादीने आरोपीस हटकले असता यातील तिन्ही आरोपी **१)अभिषेक नरेंद्र महल्ले वय २२ वर्ष, २)विकास गुणवंता तिजारे वय २५ वर्ष, ३)आकाश गुणवंता तिजारे वय २७ वर्ष सर्व रा. बरोडा ता. पारशिवनी** यांनी संगणमत करून फिर्यादीस हात बुक्क्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. ०३ याने त्याच्याजवळील चाकुने जिवे मारण्याच्या उद्देशाने फिर्यादिच्या पोटाच्या उजव्या कुशीत दोन घाव मारून फिर्यादीस गंभीर जखमी केले , अश्या फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद होता.

. **सदर प्रकरणाचे तपास सपोनि श्री पराग फुलझले ,पो. स्टे. कन्हान यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश – ३ श्रीमती एस.पी.पोंक्षे यांनी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी वरील नमुद आरोपी क्र ३ याला सदर गुन्हयात कलम ३०७ भादंवि मध्ये ०५ वर्षे सश्रम कारावास व ५,०००/– रू दंड, दंड न भरल्यास ३ महीने साधा कारावास आरोपी क्र १ आणि २ यांना कलम ३२३ भादवि मध्ये १,०००/रू दंड,दंड न भरल्यास १ महीना साधा कारावास**

**सरकारचे वतीने एपीपी श्रीमती डी.एस. गणगणे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस अंमलदार ईश्वर हुड ब.नं २३५० पो.स्टे. कन्हान यांनी मदत केली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने